# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक

**Nashik Metropolitan Region Development Authority, Nashik**

सर्व्हे नं.648/ब 2, फा. प्लॉट नं. 311 पै., जैन मंदिराजवळ, राका कॉलनी,
नाशिक – 422 002 (दूरध्वनी : 0253-2959787) email : nmrda.nsk@gmail.com

## कार्यालयीन परिपत्रक

नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील रहिवासी, औद्योगिक, वाणिज्य इ. विविध प्रयोजनांसाठीच्या अभिन्यास नकाशांना या कार्यालयाकडून प्रथमत: तात्पुरती (Tentative) परवानगी दिली जाते. तद्नंतर संबंधित अर्जदार/विकासक यांनी प्रत्यक्ष जागेवर अभिन्यासाचे सीमांकन करून नकाशे या कार्यालयाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करणे पूर्वी जागेवर अंतर्गत रस्ते WBM पद्धतीने तयार करणे बरोबरच रस्त्यांचे बाजूला किमान ०.४५ मी व्यासाची भूमिगत सीमेंट पाईप गटार (RCC Pipes) आवश्यक तेथे पुरेशा मोजमापाचे चेंबरसह (Chamber) टाकणे आवश्यक राहील. त्याशिवाय संबंधित जागेतील अभिन्यास नकाशांना मंजूरी देण्यात येणार नाही.

तसेच, विविध प्रयोजनांसाठीच्या इमारत बांधकाम नकाशांना ही या कार्यालयाकडून मंजूरी देण्यात येते. त्यानंतर पूर्ण झालेल्या इमारतीं बाबत संबंधित वास्तुविशारद यांनी पूर्णत्वाच्या दाखल्यासह प्रस्ताव सादर केल्यानंतर या कार्यालयाकडून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते.

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, चांदशी, जलालपुर सारख्या वेगाने रहिवासी विकास वाढत असलेल्या भागात सांडपाणी समस्या निर्माण होत आहे. तरी या परिपत्रकान्वये महानगर प्रदेशातील सर्व संबंधीतांना सूचना देण्यात येतात की, प्रत्येक भूखंडधारकांने, विकासकाने इमारत बांधकाम पूर्ण करतेवेळी, इमारतीतून निर्गत होणारे सांडपाणी वाहुन नेण्यासाठी भूखंडाचे समोरील हद्दीपर्यंत किमान ०.४५मी व्यासाची भूमिगत R.C.C. पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे. तसेच भूखंडासन्मुख रस्त्याचे बाजुला, तेवढ्या भूखंडाचे रुंदीसमोर ०.४५ मी व्यासाची भूमिगत R.C.C. पाईपलाईन टाकून दोन्ही बाजूस पुरेशा खोलीचे व रुंदीचे चेंबर्स बांधणे बंधनकारक आहे. जेणेकरुन नजिकच्या काळात या भागात सांडपाण्याची भूमीगत पाईपलाईन व चेंबर त्यास जोडता येतील.

**जा.क्र./ना.म.प्र.वि.प्रा/३५३**
दि३१/०४/२०२५

Nashik Metropolitan Region Development Authority ★ Nashik

२१/४/२५
(डॉ. माणिक गुरसळ.भा.प्र.से)
**महानगर आयुक्त**
**नाशिक महानगर प्रदेश**
**विकास प्राधिकरण, नाशिक**

**प्रत माहितीस्तव :-**

१. क्रेडाई, नाशिक
२. न.रे.ड.को. नाशिक
३. आर्किटेक्ट अँड इंजिनियर असोसिएशन, नाशिक
४. NMRDA, website

**प्रत कार्यवाहीस्तव:**

१. महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
२. सह महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
३. सर्व उपमहानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.
४. सर्व सहायक महानगर नियोजनकार, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक.